# हॉलंड (नेदरलँड्स)



नेदरलँड्स, हा छोटासा, पण अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असा देश आहे. येथील लोकांना डच म्हणून ओळखलं जातं. नेदरलँड्स या शब्दाचा डच भाषेतला अर्थ 'Low lands' असा आहे. याचं कारण, या देशाच्या, जवळपास अर्ध्या भूभागाची उंची, समुद्रसपाटीपासून सरासरी 1 मीटर देखील नाही. नेदरलँड्ला, खरं तर हॉलंड म्हणून जास्त ओळखलं जातं, कारण, उत्तर हॉलंड आणि दक्षिण हॉलंड हे नेदरलँड्सच्या बारा प्रदेशांपैकी दोन मोठे प्रदेश आहेत. नेदरलँड्सच्या निर्मिती अगोदर अनेक शतकं व्यापार,व्यवसाय या दृष्टीने ते अतिशय महत्वाचे होते.कारण बरेचसे अर्थिक व्यवहार हे मुख्यतः हॉलंड मधूनच चालत असत.त्यामुळे साहजिकच जगात एक व्यापारी प्रदेश म्हणून हॉलंडची ओळख प्रथम निर्माण झाली व पुढे नेदरलँड्सच्याबरोबरही ती तशीच टिकून राहिली.

हॉलंड हा शब्द होल्टलँड या शब्दावरून आलेला आहे.डच भाषेत त्याचा अर्थ हाऊटलँड म्हणजेच वुडलँड. दहाव्या

# हॉलंड (नेदरलँड्स)

शतकापर्यंत हा प्रदेश, जंगलं आणि  दलदलीचा प्रदेश म्हणून ओळखला जाई.पण पुढच्या काळात हॉलंडर्सनी अन्न शिजवणे,घरबांधणी , जहाजबांधणी या कारणांसाठी,  पुष्कळ जंगलतोड केली. थंडीपासून ऊब मिळवण्यासाठी लागणाऱ्या मोठ्या शेकोट्या तसंच वुडन क्लॉग्ज म्हणजे लाकडी बूट तयार करण्यासाठीसुद्धा बऱ्याच प्रमाणात जंगलांमधून लाकुड मिळवले गेले. त्यामुळे नंतरच्या काळात जंगलांची संख्या कमी होऊन, मर्यादित राहिली.

पुढे जंगलतोडीवर बंदी आल्यानंतर, इंधनासाठी,  दलदलीच्या प्रदेशांचा वापर करण्यास सुरुवात झाली. त्यातून  पाण्याचे साठे निर्माण झाले, तसंच तलावांची निर्मिती पण  झाली.त्यामुळे अगोदरच समुद्रसपाटीच्या खालच्या पातळीवर जमीन असणाऱ्या या देशाला पाण्याचे नियमन व व्यवस्थापन करून जमीन टिकवण्याची गरज निर्माण झाली.येथील जवळपास निम्मी जमीन, ही समुद्राला मागे हटवून तिथे भराव टाकून  मानवी वसाहत करण्यासाठी मिळवलेली आहे.ती समुद्राने परत गिळंकृत करु नये, याकरता हे लोक कायम जीवापाड मेहनत करत असतात.इथे आपल्याला दिसणारे बांध-बंधारे,कालवे,पवनचक्क्या हे त्या प्रयत्नांचंच दृश्य स्वरूप आहे, यामुळे हॉलंडमध्ये तुमची नजर पोचेल तिथपर्यंत फक्त सरळ  सपाट जमीन चं दिसते.

पूर्वीपासून स्पॅनिश, फ्रॅंक्स, रोमन ,फ्रेंच ,इंग्लिश यांच्या आक्रमणांना वेळोवेळी तोंड देऊन डच माणूस जात्याच कणखर, कष्टाळू आणि व्यवहारी बनला आहे. त्यातून सामर्थ्यशाली बनल्यानंतर अमेरिकेपासून ते अशियापर्यंत जगातल्या वेगवेगळ्या भागात त्यांनी आपल्या वसाहती निर्माण  केल्या. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड सारख्या नवीन बेटांचा शोधही डच  दर्यावर्दी लोकांनी लावला.  मायक्रोस्कोप ,टेलिस्कोप ,थर्मामीटर ह्या सारखी उपकरणं असोत किंवा नव्या काळातील ऑडिओ टेप्स, कॉम्पॅक्ट डिस्क अशा अनेक गोष्टींचा शोध लावण्यात व निर्मितीत डचांचे योगदान मोठे आहे.समुद्राकडून  कष्टाने  मिळवलेली जमीन सुपीक व्हावी ,ती व्यवस्थित कोरडी राहावी यासाठी डच लोक सतत नवीन तंत्रज्ञान वापरून प्रयत्नशील असतात. या भौगोलिक परिस्थितीमुळे हॉलंडमधील हे डच लोक, मोठ्या अभिमानाने सांगतात की, जगाची निर्मिती देवानी केली, परंतु हॉलंड ची निर्मिती मात्र डच लोकांनी केली............................ क्रमश :